शिक्षक प्रशिक्षण या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील (पहिला हप्ता) केंद्र व राज्य शासनाच्या सर्वसाधारण लेखाशीर्षातून निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः अनुवि- ४११७/(८६/१७)/प्रशिक्षण

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तारीख: २७ सप्टेंबर, २०१७

वाचा -

मनुष्यबळ व विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ ४४-०७/२०१७-ईई-९, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६.

प्रस्तावना -

केंद्र शासनाने सन-२०१७-१८ पासून केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण बदलले असून, केंद्र-राज्य हिश्याचे प्रमाण ६०:४० असे निश्चित केले आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सर्वसाधारण लेखाशीर्षातंर्गत दि.०२ ऑगस्ट, २०१७ च्या पत्रान्वये वेतन व इतर बाबींसाठी पहिला हप्ता उपलब्ध करून दिलेला आहे. त्यानुसार सन २०१७-१८ चा पहिला हप्ता वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत सर्वसाधारण लेखाशीर्षाखाली केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता पहिला हप्ता रु.११८५.०० लाख शासनास वितरित केलेला आहे. केंद्र हिश्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा रु.७९०.०० लाख इतका येतो. त्यानुसार केंद्र शासनाने वितरीत केलेला रू.११८५.०० लाख व राज्य हिस्सा रू.७९०.०० लाख अशी एकूण रू.१९७५.०० लाख इतका निधी खालील विवरणपत्रानुसार वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

पहिला हप्ता	केंद्र शासनाच्या पत्राच दिनांक	केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%)	एकूण रुपये
General Head	दि.०२/०८/२०१७	११८५.००	७९०.००	१९७५.००

केंद्र शासनाने दि.०२/०८/२०१७ च्या पत्रान्वये वितरीत केलेल्या रु.११८५.०० लक्ष व त्याअनुषंगाने राज्य हिस्सा रु.७९०.०० लक्ष असा एकूण रु.१९७५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर खर्च **"मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण, ००३-प्रशिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०१)(०३) शिक्षकांचे प्रशिक्षण (केंद्र पुरस्कृत योजना)(केंद्र हिस्सा) (२२०२३०२९)** व **मागणी क्र.ई-२,२२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ००३-प्रशिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०१)(०४) शिक्षकांचे प्रशिक्षण (केंद्र पुरस्कृत योजना)(राज्य हिस्सा) (२२०२३७८२)"** या लेखाशीर्षातून सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात यावा. तसेच, ज्या उद्दिष्टासाठी सदर निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दि.३०/०६/२०१७ व दि.०८/०८/२०१७ च्या परिपत्रकामधील अटी व शर्तींच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२८१७२१३५९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2017.09.28 17:11:05 +05'30'

(बी.आर.माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र शासन, पुणे
३. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)महाराष्ट्र राज्य, पुणे
४. संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे
५. संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे
६. संचालक (प्रौढ व अल्पसंख्याक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१/२), मुंबई/नागपूर
११. महालेखापाल (लेखा परिक्षा), १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.
१३. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था (DIECPD)
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. वित्त विभाग (व्यय-५/अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई.
१७. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मंजूर रक्कम बी.डी.एस.प्रणालीवर तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.
१८. निवडनस्ती (प्रशिक्षण).